'RESEARCH JOURNEY' International E- ... 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013) January-201
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर UGC Approved Journal

# साहित्य आणि समाज : परस्पर संबंध

डॉ. अरुण उत्तम पाटील
(मराठी विभाग प्रमुख)
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला,
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निमगाव
भ्रमणध्वनी : ९४२०८०६७८०

**प्रास्ताविक :**

साहित्य आणि समाज यांच्यातील नाते नेहमीच महत्त्वपूर्ण आणि घनिष्ठ राहिले आहे. साहित्याने समाजाचे अंत:करण शुद्ध करावे, परिवर्तनाच्या मार्गावर समाजाला चालवावे, विधायकतेची कास धरण्याकरीता मदतनीस व्हावे ही अपेक्षा साहित्याकडून ठेवलेली आहे. जगातील आजवर झालेल्या क्रांतीचा उगम शब्दातून आणि साहित्यातून झालेला दिसतो. शब्दांची ताकद विलक्षण असते. हिटलरसारखा जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटणारा खलपुरुष प्रथमत: शब्दांचे शस्त्र बनवितो, जर्मनीच्या जनतेचे माथे फिरवितो आणि त्यातून नि... जग जिंकण्याची किमया करून दाखवितो. भारतावर दिडशे वर्षे असणारी इंग्रजी राजवट उलथविण्यासाठी येथल्या समाजसुधारक आणि स्वातंत्र्यवीरांनी प्रथमत: विचारप्रवर्तक साहित्याचाच मार्ग अवलंबलेला दिसतो. मराठी संत साहित्याने खऱ्या अर्थाने भक्तीचा मार्ग प्रशस्त करतांना समाजाच्या प्रत्येक घटकाचा विचार केलेला दिसतो. समाज प्रबोधनासाठी साहित्य हेच खऱ्या अर्थाने आपल्याला उपयुक्त आहे. हे मध्ययुगीन मराठी कालखंडातील साऱ्याच वाङ्मयकारांनी ओळखले आणि त्या मार्गाने त्यांचे मार्गक्रमण झालेले दिसते.

संत–पंत–तंत कवींची परंपरा ही सामाजिक आशयाचे सूत्र साहित्यनिर्मिती करतांना स्वत:जवळ ठेवताना दिसते. संतांनी साहित्य निर्मिती केली. पंतांनी केली आणि तंत कवींनीही केली, संतांचे अभंग, श्लोक, ओवी, आरत्या, पंतांच्या आर्या, दिंड्या, साक्या, आख्यान काव्य, श्लोक तर तंत कवी अर्थात शाहीरांचे पोवाडे आणि लावण्या या साऱ्याच वाङ्मयामध्ये सामाजिक अभिसरणाचा मुद्दा विचारात घेतलेला दिसतो. त्यानंतरच्या काळात निबंध वाङ्मयाच्याद्वारे समाजप्रबोधनाचा वारसा स्वातंत्र्यवीर आणि समाज सुधारकांनी पुढे नेला. आजच्या काळातील लेखक जे लिहितात, त्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. समाजात जे घडते ते कथा–कादंबऱ्यांमध्ये दिसते, कवितेमध्ये दिसते, नाटकामध्ये दिसते म्हणून साहित्य हे समाजाचा आरसा ठरते.

साहित्याची परंपरा बघता अनेक साहित्यिकांनी ग्रामीण समाजजीवन, शेतकऱ्यांची कर्म कहाणी, दलितांचे जीवन, स्त्रियांची वाटचाल, तिचे व्यवस्थेमधील दुय्यम स्थान, समाजातील दांभिकता, अनिष्ट चाली–रूढी–परंपरा या साऱ्याचा उहापोह आपल्या साहित्यात केलेला दिसतो. केवळ पारंपरिक मार्गानेच नव्हे तर नव्या सामाजिक प्रवाहांनाही साहित्याने स्वीकारलेले दिसते. कामगारांचे प्रश्न, मोठमोठया कंपनी क्षेत्रातील राजकारण, टेक्नोसॅ... झालेला समाज, स्त्री–पुरूष लैंगीक संबंधातील अनिर्बंधता, प्रसार माध्यमातील जीवघेणी स्पर्धा, 'लेदर करन्सी'चे जीवघेणे दुष्टचक्र, ग्रामीण भागातून शहरी भागाच्या आकर्षणापोटी आलेला ग्रामीण माणूस आणि त्याच्या ... येण्याने नव्या स्वरूपात निर्माण झालेल्या नवनवीन समस्या हा सारा मानवी कंगोऱ्यांचा विशाल पट समाज आणि साहित्य याद्वारे परस्परातील अन्योन्य संबंध दाखविणारा ठरल्याशिवाय रहात नाही.

**ग्रामीण साहित्य आणि समाज–** समाजाची जडणघडण साहित्याच्या आधाराने होत असते. ग्रामीण साहित्याचा विचार करावयाचा झाला तर ग्रामीण साहित्यात विशेषत्वाने शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

हात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाद्वारे शेतकऱ्यांच्या हलाखिचे चित्र समाजापुढे मांडले आहे. यासोबतच 'ब्राह्मणांचे कसब' व 'गुलामगिरी' या पुस्तकांद्वारे सामाजिक विषमतेवर बोट ठेवलेले दिसते. त्याचवेळी १९२७ मध्ये प्र.ह. खाडिलकरांच्या स्वाधीन संसार या कादंबरीतून खेडयातील जनजीवन रेखाटलेले दिसते. १९३० मध्ये भार्गवराम वरेरकरांनी लिहिलेल्या 'सात लाखातील एक' या कादंबरीत ग्रामीण जीवन तसेच खेडयातून शहरात आलेल्या खेडूतांच्या ससेहोलपटीविषयीचा पट मांडलेला दिसतो. ग.रा. वाळींबे (रामतनय) यांची 'मोहित्यांची मंजुळा' ही कादंबरी 'अन्नदाता उपाशी' ही वि.वा. हडप यांची कादंबरी, वि.ल.बर्वे यांची मुचकुंददरी' ही कादंबरी यामध्ये ग्रामीण साहित्याची धारा अधिकाधिक पक्व होत गेलेली दिसते.

१९४७ नंतर भारतीय स्वातंत्र्याचा कालखंड हा परिवर्तनाचा कालखंड म्हणवला गेला. १९४७ च्या आधी आणि नंतर स्वातंत्र्य क्रांतीचे वर्णन लेखक कवींनी केले त्याला ग्रामीण साहित्य अपवाद नाही 'बळी' ही १९५० मध्ये आलेली विभावरी शिरूरकरांची स्त्रीजीवनाचे वर्णन करते तर गो.नि. दांडेकरांच्या 'माचीवरला बुधा' या कादंबरीत खेडयातला बुधा पोटासाठी मुंबईत येतो, तेथेच रडतखडत आयुष्य काढतो, हे त्यांनी दाखविले आहे.

अलीकडच्या काळात विश्वास पाटील यांची 'पांगीरा' कादंबरी त्याआधी रा.रं. बोराडे यांची आलेली 'पाचोळा', आनंद यादवांची 'गोतावळा', शंकर पाटलांची 'टारफूला', उद्धव शेळकेंची 'धग' तर नव्याने आलेली सदानंद देशमुखांची 'बारोमास' किंवा नवनाथ गोरेंची 'फेसाटी' हे सारे लेखन ग्रामीण समाज जीवनाचे प्रत्ययकारी वर्णन करणारे आहे.

**दलित साहित्य आणि समाज :—**

प्रा. राजीव आरके म्हणतात, ''दलित साहित्याने समाजाला 'चळवळ' हे क्रियाशील तत्त्व दिले. चळवळ ही कोणत्याही समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असते. मानवी जीवनात चळवळीला जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व सामाजिक जीवनात चळवळीला आहे. कारण समाजाची गतिमानता ही त्या चळवळीचे अस्तित्व आहे की, नाही त्यावर अवलंबून असते.''

वरील विवेचनावरून लक्षात येते की, दलित समाजाला जागृत करण्यासाठी चळवळीचे शस्त्र जसे माध्यम म्हणून प्राप्त झाले तसेच दलितोद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाती लेखणी घेऊन दलित बांधवांसाठी 'शब्द' हेही अत्यंत महत्त्वाचे शस्त्र होऊ शकते हे दाखवून दिले. डॉ. बाबासाहेबांनी साहित्याची दाखविलेली वाट दलित साहित्यातील नवनिर्मितीचा सृजनशील हुंकार कायम ताजा ठेवणारी ठरली. दलित साहित्यात या वाटेवरून चालणाऱ्यांनी आत्मशोध सुरू केला. नकार—वेदना—विद्रोह या त्रिसूत्रीचा अवलंब दलित साहित्याने दलित साहित्यिकांना शिकविला.

कवी बाबुराव बागुल एका कवितेत म्हणतात,

हे माणसा,
तूच सूर्याला सूर्य म्हटले
आणि सूर्य सूर्य झाला
तूच चंद्राला चंद्र म्हटलेस
आणि चंद्र चंद्र झाला
अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस
अन् प्रत्येकाने मान्य केले

हे प्रतिभावान माणसा
तूच आहेस सर्व काही
तुझ्यामुळेच सजीव सुंदर
झाली ही मही

किंवा उत्तम कांबळे म्हणतात,

पाहिली मी कित्येक मंदिरे
माणसाला रोखणारी
माणसाला कोंडणारी
माणसाच्या भाळावर
विषमता कोरणारी
आता बंधुतेची लेणी खोदण्या
आलो मी
वाचला इतिहास किती मी
माणसाच्या गुलामीचा
चितेवरच्या समतेच्या
पाण्याच्या थेंबासाठी
मानवता ठेवण्याचा
आता नवा इतिहास घडविण्या
आलो मी.

लोकशाही मूल्यांचा स्वीकार, सर्वकष विषमतेला विरोध, मनुष्य हा निसर्गतः स्वतंत्र आहे म
मानवाच्या प्रतिष्ठेची जपणूक आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समतेची प्रतिष्ठापना या बाबासाहेबांच्या प्र
विचारांचे प्रतिबिंब दलित साहित्यात उमटलेले दिसते. १९६० नंतर दलित साहित्यात आलेली आत्मकथना
लाट खऱ्या अर्थाने दलित साहित्याला समृध्द करतांना दिसते.

शंकरराव खरातांचे 'तराळ अंतराळ' पार्थ पोळकेंचे 'आभराण', माधव कोंडविलकरांचे 'मुक्काम पो
देवाचे गोठणे', लक्ष्मण मानेंचे 'उपरा', लक्ष्मण गायकवाडांचे 'उचल्या', दया पवारांचे 'बलुतं', प्र.ई. सोनकांबळे
'आठवणीचे पक्षी' यासारखे सुमारे शंभराहून अधिक आत्मकथने दलित समाजाची दुःख आणि जी
जगण्यातील ससेहोलपट समोर ठेवतात, त्याचवेळी वामन होवाळ, बाबुराव बागुल, योगीराज वाघमारे, अमिता
केशव मेश्राम, भास्कर चंदनशीव हे लेखक नव्या धर्तीच्या कथा लिहितांना दिसतात.

**लोकसाहित्य आणि समाज :**

ज्याच्या नावातच 'लोक' आहे असे साहित्य लोकांनी लोकांसाठी लोकांमधून निर्माण केले. मौखि
परंपरेने समाजामध्ये एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पिढ्यानुपिढ्या चालत आलेले लोकसाहित्य कोणा एका
मालकीचे नाही तर त्याचे वेळोवेळीचे कर्ते अनामिक आहेत. लोकसाहित्याचा कालखंड अनामिक आ
लोकसाहित्य सामाजाच्या सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व करते. लोकसाहित्य सौंदर्याचा गुण दिसून येतो. स्थानि
रुढी– परंपराशी संबंधीत हे साहित्य असते. लोकगीते, लोककथा, वाक्प्रयोग, लोककला या साऱ्यांचा समावे
लोकसाहित्यात होतो.

मराठी लोकसाहित्याचा आयाम खूप मोठा असून प्रत्येक मराठी माणसाचा केव्हा ना केव्हा आणि कुठल्या ना कुठल्या कारणाने लोकसाहित्याच्या कोणत्या ना कोणत्या प्रकाराशी संबंध आलेला दिसतो. घरातील मंगल प्रसंगाच्या वेळी, सणवारांच्या वेळी, काम करण्यच्या वेळी, पुजापाठाच्या वेळी लोकसाहित्यातील गीते– कथा– कला सादर केल्या जातात. त्यामुळे लोकसाहित्य हे केवळ साहित्य नसून तो जगण्याचा एक भाग आहे. लोक संस्कृतीशी संबंध असणाऱ्या परंपरा व विधीकर्म याची सारी पाळेमुळे लोकसाहित्यात सापडतात. लोकसाहित्यातून लोकशिक्षण व्हावे हा प्रमुख उद्देश लोकसाहित्य निर्मितीच्या पाठीशी आहे.

लोकसाहित्य हे खऱ्या अर्थाने समाजाचा आरसा म्हटले जाते. लोकांची जीवनशैली निसर्गाशी जुळणारी आणि धार्मिक असल्याने माणूस जीवन जगतांना लोकसंस्कृतीतील धर्म– अध्यात्म– सुख– दुख, सणवार या बाबींशी एकरुप होतो. त्यातून लोककलांसारखा अध्यात्मप्रवण लोकसाहित्याचा प्रकार समाजाला कमालीचा आवडतो.

समाज परिवर्तनाच्या दृष्टीने लोकसाहित्याची काही ठळक वैशिष्ट्ये आणि उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील. लोकसाहित्यामुळे संस्कृतीचे सातत्य टिकते, लोकसाहित्याद्वारे समुहभावाची निर्मिती होते, लोकसाहित्य हे नीतीशिक्षणाचे माध्यम ठरते, लोकसाहित्य समाजाची भौतिक गरज भागविण्याचे साधन आहे, लोकसाहित्य अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे, लोकसाहित्यातून सामाजिक संस्थांना समर्थन प्राप्त होते, लोकसाहित्य प्रचाराचे माध्यम म्हणून वापरता येते.

**आदिवासी साहित्य आणि समाज :**

एकीकडे दलित साहित्याची विचारधारा महाराष्ट्राच्या पटलावर प्रज्वलीत होत असतानाच आदिवासी साहित्यानेही चांगलेच मूळ धरलेले दिसते. महाराष्ट्रामध्ये आदिवासींच्या संदर्भात इंग्रज संशोधकांनी मोठ्या प्रमाणात काम केले.

१९८० च्या सुमारास आदिवासी कवितेने जन्म घेतलेला दिसतो. भुजंग मेश्राम यांचा 'आदिवासी कविता', 'वाहरु सोनवणे यांचा 'गोधड', डॉ. विनायक तुकारामांचा 'गोंडवन पेटले आहे. उषाकिरण आत्राम यांचा 'मोट्यारीन', निलकांत कुलसंगेचा 'इंद्रियारण्य' असे असंख्य काव्यसंग्रह आलेले दिसतात. पुरुषोत्तम कुमरे, प्रभु राजगडकर, पितांबर कोडापे, दशरथ मडावी, ब्रह्मानंद मडावी, विरसिंग पाडवी यांच्यासारखे अनेक कवी नव्या दमाने आदिवासी कविता लिहू लागले.

गोदावरी परुळेकरांनी 'माणूस जेव्हा जागा होतो' हे पुस्तक लिहून आदिवासी लोकजीवनावर धगधगीत प्रकाश टाकला. गो.नी. दांडेकर यांची 'जैत रे जैत' ही कादंबरी, तारा भवाळकर यांचे 'आदिवासी संस्कृती', नजुबाई गावीत यांची पुस्तके यातून आदिवासींच्या चालीरितींचा परिचय महाराष्ट्राला झाला.

सांस्कृतिक संपन्नता, धार्मिक आदिबंध आणि आदिवासींचा गौरवशाली इतिहास आदिवासी साहित्याची प्रेरणा आहे. तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, भागोजी नाईक या व्यक्ती आदिवासी साहित्य निर्मितीपाठीशी प्रेरणादायी ठरल्या आहेत.

देशाच्या सामाजिक– सांस्कृतिक– राजकीय जडण घडणीत आदिवासी समाजाचा मोठा सहभाग राहिल्याने त्यांच्या साहित्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. समाज आणि आदिवासी साहित्य यांचा परस्पर अनुबंध याठिकाणी या साऱ्या पार्श्वभूमीवर अधोरेखित करावासा वाटतो.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-20

**समारोप** : तात्पर्य, समाज आणि साहित्य या नाण्याच्या दोन बाजू असल्याने समाजाचे सरळ सरळ प्रतिबिंब साहित्यात पडलेले दिसते. समाजात उमटणारे वेगवेगळे विचारतरंग साहित्यिक लक्षात घेतात आणि त्यांची मांडणी आपल्या साहित्यात करतात. निर्माण होणारे इतंभूत साहित्य समाजाला सोडून वेगळे असूच शकत नाही एवढेच याठिकाणी सांगावेसे वाटते.

**संदर्भ ग्रंथ** :

१. समाजाच्या जडण घडणीतील मराठी साहित्याचे योगदान संपादक– डॉ. विजय हिरालाल उमाळे
२. साहित्य आणि सामाजिक संदर्भ : डॉ. अंजली सोमण
३. ग्रामीण साहित्य 'स्वरुप आणि समस्या', डॉ. आनंद यादव
४. दलित साहित्याचे निराळेपण : डॉ. प्रभाकर मांडे
५. मराठी वाङ्मयाचा इतिहास : शं.गो. तुळपुळे
६. लोकसाहित्य : भाषा आणि संस्कृती: डॉ. सरोजिनी बाबर

RESEARCH JOURNEY